## महाराष्ट्र शासन

<u>तातडीचे</u>

क्रमांक : संकीर्ण २०१२/८०५/प्र.क्र.३८१/६
सामान्य प्रशासन विभाग,
१९ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
दि. ४ सप्टेंबर, २०१२.

प्रति,

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**विषय :** माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये कार्यवाही करण्याबाबत
**संदर्भ :** राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे क्र.मुमाआ/अपील/शास्ती/२०१२,
दि. १७/८/२०१२ चे अ.शा. पत्र.

महोदय,

मा. मुख्य माहिती आयुक्तांच्या संदर्भाधीन पत्राची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत पाठविली आहे.

सदर पत्रान्वये मा.माहिती आयुक्तांनी असे कळविले आहे की, माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अंतर्गत राज्य माहिती आयोगाने कोणत्याही तक्रारीवर किंवा अपिलावर निर्णय देतेवेळी जन माहिती अधिकाऱ्याने कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळण्याबाबतचा अर्ज स्विकारण्यास नकार दिला आहे किंवा चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे असे आयोगाचे मत झाले असेल, अशा प्रकरणात शास्ती लावण्याची तरतूद आहे. आयोगाने आतापर्यंत अशा अनेक प्रकरणात शास्ती लावली असली तरी याबाबतची प्रत्यक्ष वसूली मात्र नीटपणे होत नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले असल्याने आयोगाने याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

आपणांस विनंती करण्यात येते की, मा.माहिती आयुक्तांच्या वरील पत्रात उल्लेख केलेल्या सूचनेचे आपल्या विभागाच्या स्तरावरुन तसेच आपल्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख व सर्व सार्वजनिक प्राधिकरणांकडून काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी तसेच याबाबत आपण आपल्या अधिपत्याखालील प्रादेशिक विभाग प्रमुख, विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना सूचना द्याव्यात ही विनंती.

आपणास असेही कळविण्यात येते की, ज्या ज्या वेळी आपणास वरीलप्रमाणे शास्ती लावण्याचे/वसूलीचे आदेश माहिती आयोगाकडून प्राप्त होतील त्यावेळी लगेच असे आदेश संबंधितांना पाठवून वसूलीसंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील प्रादेशिक विभाग प्रमुख, विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना द्याव्यात अशी ही विनंती.

सोबत - वरीलप्रमाणे

आपला विश्वासू,
डॉ. पी. एस. मीना
अपर मुख्य सचिव (र.व का.)